नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ थे Year - 4rd | अंक - १५९ Issue - 159 | वार - बुधवार दि. ४ नोव्हेंबर २०२६ Blow- Wednesday Date 4 NOVEMBER 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

मुरासू चक्रीवादळाचा हाहाकार; जनजीवन विस्कळीत, ३० विमान उड्डाणे रद्द

तामिळनाडूत मुसळधार पाऊस; कुड्डालोरमध्ये शाळा बंद, आंध्र प्रदेशातील ३ जिल्ह्यांमध्ये रेड अलर्ट

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क



हैदराबाद : आंध्र प्रदेशच्या किनारपट्टीला धडकलेले मुरासू चक्रीवादळ तेलंगणाच्या दिशेने सरकले आहे. दिलासादायक बाब म्हणजे त्याची तीव्रता ताशी १०० किमीवरून ताशी ६० किमीपर्यंत कमी झाली आहे. चक्रीवादळाचा एक भाग अजूनही आंध्रच्या किनारपट्टीवरून जात असून, त्याम ुळे विजयवाडासह अनेक जिल्ह्यांम ध्ये मुसळधार पाऊस पडत आहे. हवाम ान विभागाने मंगळवार संध्याकाळपर्यंत सोसाट्याचा वारा आणि मुसळधार पा-वसाचा इशारा दिला आहे. मंगळवारी रात्री सुमारे १ वाजता मुरासू चक्रीवादळाने आंध्र प्रदेशच्या किनारपट्टीला धडक दिली, त्यावेळी वाऱ्याचा वेग ताशी १२० किमीपर्यंत पोहोचला होता. हजारो झाडे उन्मळून पडली आणि शेकडो विजेच्या खांबांचे नुकसान झाले. अनेक बोटींचेही नुकसान झाले.

मुसळधार पावसामुळे आंध्र प्रद-ेशातील किनारपट्टीच्या शहरांमध्ये रस्ते पाण्याखाली गेले आणि महामार्गांवर वाहने अडकून पडली. मंगळवारी विजयवाडा, विशाखापट्टणम, तिरुपती आणि चेन्नई विमानतळांवरून तीस देशांतर्गत विमान-सेवा रद्द करण्यात आल्या. आंध्र प्रदेश-तील काकीनाडा या किनारपट्टीच्या शहरात मुसळधार पावसामुळे सखल भागांत पाणी साचले असून, रस्ते पाण्याखाली गेले आहेत.

मुरसू चक्रीवादळामुळे झालेल्या मुसळधार पावसामुळे तामिळनाडूतील कुड्डालोरमधील शाळा मंगळवारी बंद ठेवण्यात आल्या आहेत. जिल्ह्यातील अनेक भागांमध्ये मेघगर्जना, विजांचा कडकडाट आणि सततच्या पावसाम ुळे जनजीवन विस्कळीत झाल्यानंतर कुड्डालोर जिल्हाधिकाऱ्यांनी हा आदेश जारी केला.

विशाखापट्टणम हवामान विभागाचे संचालक पी. एल. एन. मूर्ती यांच्या माहितीनुसार, मुरसू चक्रीवादळाने मंगळवारी पहाटे ओंगोलेजवळ आंध्र प्रदेशची किनारपट्टी ओलांडली. ते सध्या दक्षिण आंध्र प्रदेशच्या किनारपट्टीजवळ तीव्र चक्रीवादळाच्या स्वरूपात आहे. पुढील १२ तासांत ते उत्तर-वायव्य दिशेने सरकण्याची आणि मंगळवार दुपारपर्यंत चक्रीवादळात रूपांतरित होण्याची शक्यता आहे. हवामान विभागाने राज्यातील तीन जिल्ह्यांमध्ये रेड अलर्ट आणि उर्वरित जिल्ह्यांमध्ये ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. मच्छिमारांना पुढील दोन दिवस समुद्रात न जाण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

सोलापूर बसस्थानकाच्या स्वच्छतेत आणखी सुधारणा करा



दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचे एसटी प्रशासनाला निर्देश

सोलापूर : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) प्रवाशांना स्वच्छ, सुरक्षित आणि दर्जे दार सेवा उपलब्ध करून देण्यासाठी स्थानिक प्रशासनाने आवश्यक सुविधांच्या पूर्ततेवर विशेष भर द्यावा, असे निर्दे श परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी आज दिले. मंत्री सरनाईक यांनी आज सोलापूर मध्यवर्ती बसस्थानकाला भेट देऊन तेथील स्वच्छतागृहे, पाणपोई आणि इतर प्रवासी सुविधांची पाहणी केली. बसस्थानकात झालेल्या सुधारणांबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. मात्र, स्वच्छतेच्या बाबतीत अद्याप सुधारणा करण्यास मोठा वाव असून, बसस्थानक परिसर स्वच्छ आणि आरोग्यदायी ठेवण्यासाठी प्रशास-नाने अधिक दक्षतेने काम करावे, असे त्यांनी स्पष्ट केले.

या भेटीदरम्यान मंत्री सरनाईक यांनी बसस्थानकातील प्रवाशांशी थेट संवाद साधला. एसटीच्या नवीन बसेसबाबत प्रवाशांनी समाधान व्यक्त केले. भविष्यातही अशीच दर्जेदार सेवा मिळावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. त्याचवेळी प्रवाशांनी स्थानिक समस्याही मंत्री महोदयांसमोर मांडल्या. दोन मुख्य शहरा दरम्यान विनावाहक सेवा सुरू करण्याची मागणी प्रवाशांनी केली. प्रवाशांच्या तक्रारी आणि सूचनांची दखल घेत मंत्री सरनाईक यांनी संबंधित एसटी अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सुधारणा करण्याच्या सूचना दिल्या. प्रवाशांच्या सोयीसाठी आणि त्यांच्या समाधानासाठी एसटी प्रशासनाने संवेदनशीलतेने काम करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. प्रवाशांना उत्तम सुविधा, स्वच्छ बसस्थानके आणि समाधानकारक प्रवास अनुभव देणे हे एसटी महामंडळाचे प्राधान्य आहे. या उद्दिष्टाच्या पूर्ततेसाठी स्थानिक प्रशासनाने सातत्याने प्रयत्न करावेत, असे आवाहनही मंत्री सरनाईक यांनी केले.

'मुरासू' चक्रीवादळामुळे कोकण, मराठवाडा अन् मध्य महाराष्ट्रात वादळी वाऱ्याची शक्यता, हवामान विभागाचा अलर्ट

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

नवी दिल्ली : बंगालच्या उपसागरात निर्माण झालेले 'मुरासू' हे चक्रीवादळ तीव्र वेगाने किनारपट्टीच्या दिशेने सरकत असून त्याचे रूपांतर अत्यंत भीषण चक्रीवादळात होण्याची शक्यता आहे. या वादळाचा थेट आणि मुख्य फटका आंध्र प्रदेशच्या किनारपट्टीला बसणार आहे. तसेच, या चक्रीवादळाच्या प्रभावामुळे आणि अरबी समुद्रातील चक्राकार वाऱ्यांच्या स्थितीमुळे महाराष्ट्रातील हवामानातही मोठे बदल होणार आहेत. राज्यातील कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात पुढील ४ ते ५ दिवस वादळी वाऱ्यासह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता भारतीय हवामान विभागाने वर्तवली आहे.

हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, ५ नोव्हेंबर या कालावधीत महाराष्ट्रातील अनेक भागांत मेघगर्जना, विजांचा कडकडाट आणि ताशी ३० ते ६० किलोमीटर वेगाने वारे वाहण्याचा अंदाज आहे. ४ नोव्हेंबरदरम्यान विजांच्या कडकडाटासह वादळी पाऊस पडू शकतो, तसेच ताशी ४० ते ५० किमी वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे. आज ३ नोव्हेंबर रोजी काही भागांत विजांचा कडकडाट आणि वादळी वाऱ्यासह पावसाचा इशारा देण्यात आला आहे. आज ३ नोव्हेंबर रोजी मराठवाड्यात जोरदार वारे आणि मेघगर्जनेसह पावसाचा जोर अधिक दिसू शकतो.

बंगालच्या उपसागरात घोंघावणारे तीव्र चक्रीवादळ 'मुरासू' आज मंगळवारी सकाळी आंध्र प्रदेशच्या किनारपट्टीवर धडकण्याची शक्यता आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार हे चक्रीवादळ पुढील काही तासांत किनारपट्टी ओलांडू शकते. या काळात वाऱ्याचा वेग ताशी ११० किलोम ीटरपर्यंत राहण्याची शक्यता असून, तो ताशी १२० किलोमीटरपर्यंतही पोहोचू शकतो. या चक्रीवादळाच्या प्रभावामुळे दक्षिण भारतातील ५ राज्यांना मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा (पान २ वर...)



अवैध सावकारीविरोधात पंढरपूर तालुक्यातील सोनके येथे चार जणांच्या घरांची झडती

जिल्ह्यातील नागरिकांनी अवैध सावकारीविरोधात तक्रार करावी : जिल्हाधिकारी एस. कार्तीकेयन

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

जिल्ह्यात कोठेही सक्तीने कर्जवसुली होत असल्यास तात्काळ तालुका सहाय्यक निबंधकांशी संपर्क साधावा

सोलापूर, (जिमाका) : जिल्ह्या-तील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर खाजगी सावकारांनी शेतकऱ्यांकडून सक्तीने कर्जवसुली करू नये, असे निर्दे श जिल्हाधिकारी एस. कार्तीकेयन यांनी शासन निर्णय जाहीर झाल्यानंतर दिलेले होते. तरीही जिल्ह्यात खाजगी सावकारांकडून धमकी देऊन किंवा बळाचा वापर करून कर्जवसुली केली जात असल्यास नागरिकांनी तात्काळ संबंधित तालुका सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन त्यांनी केले आहे.

जिल्ह्यातील सर्व ११ तालुक्यांमध्ये दुष्काळी परिस्थिती असल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत आहेत. या परिस्थितीत शेतकऱ्यांना दिलासा मिळावा आणि त्यांच्यावर कर्जवसुलीसाठी कोणताही अनुचित दबाव आणला जाऊ नये, यासाठी जिल्हाधिकारी यांनी संबंधित यंत्रणांना आवश्यक निर्देश दिले होते. त्यानुसार जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था मुकुंद पवार यांनी जिल्ह्यातील ११ तालुक्यांमध्ये तालुका सहाय्यक निबंधकांच्या अध्यक्षतेखाली दक्षता पथकांची स्थापना केली आहे.

या पथकांमध्ये सहकार विभागातील अन्य अधिकाऱ्यांचाही समावेश करण्यात आला आहे. खाजगी सावकारीच्या माध्यम ातून शेतकऱ्यांची आर्थिक पिळवणूक होऊ नये आणि अवैध सावकारीवर नियंत्रण ठेवण्यासाठी या पथकांमार्फत कार्यवाही करण्यात येत आहे.

सोनके येथे चार जणांच्या घरांची झडती

अवैध सावकारीविरोधात सहकार विभागाने पंढरपूर तालुक्यातील मौजे सोनके येथे दि. २ नोव्हेंबर रोजी कारवाई केली. महाराष्ट्र सावकारी नियमन अधिनियम, २०१४ मधील कलम १६ अन्वये करण्यात आलेल्या या कारवाईदरम्यान सागर जनार्दन कोळेकर, सचिन मारुती पाटील (खरात), रणजित आजिनाथ कोळेकर आणि महेश गलांडे या सोनके येथील चार रहिवाशांच्या घरांची झडती घेण्यात आली.

तक्रार करण्याचे आवाहन

जिल्ह्यात कुठेही अवैध सावकारी होत असल्याची माहिती किंवा तक्रार असल्यास नागरिकांनी संबंधित तालुक्याच्या सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था कार्यालयाशी तात्काळ संपर्क साधावा. अवैध सावकारीला बळी पडू नये तसेच सक्तीच्या कर्जवसुलीविरोधात प्रशासनाकडे तक्रार नोंदवावी, असे आवाहन जिल्हाधिकारी एस. कार्तीकेयन यांनी केले आहे.

दैनिक
यश सिद्धि न्यूज

संपादकीय....

चढ-उतार

गेल्या काही काळातील घडामोडींमुळे सोन्याच्या भावात मोठी अस्थिरता निर्माण झाली आहे. कोरोना महामारीच्या काळात अनेक जणांनी सुरक्षित गुंतवणूक म्हणून सोन्यात इन्व्हेस्ट केले होते. त्यामुळे सोन्याचे भाव गगनाला भिडले होते, मात्र आताच्या बदलत्या आर्थिक परिस्थितीमुळे सोन्याचे दर अत्यंत संवेदनशील आणि चढ-उताराचे झाले आहेत. भारतातील सोन्याची एकूण मागणी यावर्षी सहा वर्षांतील अतिशय खाली येऊन पोहोचू शकते. सोन्याच्या वाढत्या किम तींमुळे लोक दागिने खरेदी करण्यापासून दूर होत आहेत, तर दुसरीकडे गुंतवणुकीसाठीची खरेदीदेखील कमकुवत झाली आहे. भारतातील सोन्याची मागणी २०२६ मध्ये सुमारे ६५० मेट्रिक टनांपर्यंत कमी होऊ शकते. तसेच कमी पाऊस आणि ग्रामीण भागातील घटते उत्पन्न यांचाही सोन्याच्या खरेदीवर परिणाम होत आहे, असे वर्ल्ड गोल्ड कौन्सिलचे म्हणणे आहे. गेल्या काही वर्षांत सोन्याच्या दरात मोठी वाढ झाली असून, याचा थेट परिणाम ग्राहकांच्या भावनांवर होत आहे. वाढत्या किमतींमुळे लोक दागिने खरेदी करण्यापासून परावृत्त होत आहेत. वर्ल्ड गोल्ड कौन्सिलने अशी शक्यता वर्तवली आहे की, २०२६ मध्ये भारतातील सोन्याची मागणी सुमारे ६५० मेट्रिक टनपर्यंत पोहोचू शकते. २०२० नंतरची ही सर्वात कमी मागणी असेल. २०२० मध्ये, कोरोनामुळे लॉकडाऊन लागू झाला, ज्याचा सोन्याच्या खरेदीवर मोठा परिणाम झाला. तसेच सप्टेंबरच्या तीन महिन्यांपर्यंच्या आकडेवारीतही सोन्याच्या खरेदीतील घट ठळकपणे दिसून आली. जुलै ते सप्टेंबर दरम्यान, भारतातील सोन्याची मागणी वार्षिक तुलनेत सरासरी २९ टक्क्यांनी घसरून १६२.५ मेट्रिक टन झाली. याच काळात दागिन्यांची खरेदी २० टक्क्यांनी घटली, तर गुंतवणुकीसाठीच्या सोन्याची मागणी ४० टक्क्यांनी कमी झाली. याचा अर्थ असा की, केवळ दागिने खरेदी करणारेच नव्हे, तर गुंतवणुकीसाठी सोने खरेदी करणाऱ्यांनीही या काळात खरेदी करणे थांबवले. सोन्याच्या मागणीत घट होण्याचे मुख्य कारण सोन्याच्या वाढलेल्या किमती हे आहे. तसेच इराण युद्धापासून महागाई वाढली आहे, ज्यामुळे कौटुंबिक बजेटवर ताण येत आहे आणि लोक पूर्वीप्रमाणे सोन्यावर जास्त खर्च करू शकत नाहीत. परिणामी, सोन्याच्या वाढलेल्या किम तीचा विशेषतः दागिन्यांच्या खरेदीवर परिणाम होत आहे. सोन्याचे भाव गगनाला भिडल्यामुळे, अनेक ग्राहक खरेदी पुढे ढकलत आहेत किंवा पूर्वीपेक्षा कमी वजनाचे दागिने खरेदी करत आहेत.

गुरुंच्या स्मृती जपण्याचा माजी विद्यार्थ्यांचा स्तुत्य उपक्रम!

स्व. संदांशिव सरांच्या स्मृतिप्रीत्यर्थ प्रकल्प विद्यालय, भातसानगर मधील पाच गुणवंत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व सन्मानपत्र प्रदान; उपक्रमाचे यंदा पाचवे वर्ष

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

शहापूर / विजय घनघाव : शिक्षक कधीच निवृत्त होत नाहीत आणि विद्यार्थ्यांच्या मनातून कधीच विस्मृतीत जात नाहीत. त्यांनी दिलेले ज्ञान, संस्कार, प्रेम आणि मायेची शिदोरी आयुष्यभर विद्यार्थ्यांसोबत राहते. अशाच एका प्रेमळ, कर्तव्यदक्ष आणि विद्यार्थ्यांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या शिक्षकाच्या स्मृती जपण्याचे प्रेरणादायी कार्य प्रकल्प विद्यालयाच्या १९९३-९४ च्या माजी विद्यार्थी बॅचकडून अविरतपणे सुरू आहे.





प्रकल्प विद्यालयातील सर्वांचे लाडके शिक्षक स्वर्गीय आदरणीय संदांशिव सर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ माजी विद्यार्थ्यांनी सुरू केलेल्या शिष्यवृत्ती उपक्रमाचे यंदा पाचवे वर्ष आहे. या उपक्रमांतर्गत यंदाही विद्यालयातील पाच होतकरू, गुणवंत आणि गरजू विद्यार्थ्यांना सरांच्या नावाने शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली. विशेष म्हणजे, या पाचही विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेचे कौतुक आणि भविष्यातील वाटचालीसाठी प्रोत्साहन म्हणून सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

सरांचे व्यक्तिमत्त्व म्हणजे प्रेम, माया आणि माणुसकीचा सुंदर संगम!

स्व. संदांशिव सर हे केवळ शिकवणारे शिक्षक नव्हते, तर विद्यार्थ्यांना आपलेपणाची जाणीव करून देणारे एक मोठे आधारवड होते. प्रत्येक विद्यार्थ्यावर समान प्रेम करणे, सर्वांना मायेने वागवणे, विद्यार्थ्यांच्या अडचणी समजून घेणे आणि गरजूंच्या मदतीसाठी नेहमी पुढे येणे, हा त्यांच्या स्वभावाचा विशेष होता. त्यांच्या सहवासात शिकलेल्या विद्यार्थ्यांच्या मनात आजही सरांविषयी अपार आदर आणि प्रेम आहे.

सरांना आपल्यातून जाऊन जवळपास सहा वर्षे झाली, मात्र त्यांच्या आठवणी आजही तितक्याच जिवंत आहेत. सरांसारखे प्रेमळ, संवेदनशील आणि माणुसकी जपणारे व्यक्तिमत्त्व पुन्हा होणे कठीणच. त्यांनी विद्यार्थ्यांना केवळ शिक्षण दिले नाही, तर आयुष्य कसे जगावे आणि दुसऱ्याच्या उपयोगी कसे पडावे, याचे संस्कारही दिले.

शिष्यवृत्तीच्या माध्यमातून सरांच्या संस्कारांचा वारसा पुढे!

आज पाच गरजू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान करताना आणि त्यांचा सन्मानपत्र देऊन गौरव करताना १९९३-९४ च्या माजी विद्यार्थ्यांना आपल्या शाळेतील जुन्या आठवणींनी भावूक केले. सरांचा सहवास, त्यांचे मार्गदर्शन आणि त्यांनी दिलेली माया पुन्हा एकदा स्मरणात आली. यावेळी सुनील दाभाडे आणि हरिश्चंद्र अधिकारी उपस्थित होते. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदतीसोबतच आत्मविश्वास आणि पुढे जाण्याची प्रेरणा मिळत आहे.

माजी विद्यार्थ्यांनी हा उपक्रम भविष्यातही अखंडपणे सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. सरांच्या स्मृतींना उजाळा देत त्यांच्या नावाने गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला हातभार लावणे, हीच त्यांच्यासाठी खरी गुरुदक्षिणा असल्याची भावना या उपक्रमातून व्यक्त होत आहे.

आज सर प्रत्यक्ष आपल्यात नाहीत; पण त्यांच्या नावाने एखाद्या विद्यार्थ्याच्या शिक्षणाला मदत मिळते, एखाद्या गुणवंत विद्यार्थ्याचा सन्मान होतो आणि त्याच्या स्वप्नांना नवी दिशा मिळते, तेव्हा सरांचे अस्तित्व पुन्हा एकदा जाणवते.

गुरूंचे ऋण कधीच फिटत नाही; मात्र त्यांनी दिलेले संस्कार कृतीतून जपता येतात. प्रकल्प विद्यालयाच्या १९९३-९४ च्या माजी विद्यार्थी बॅचने सुरू ठेवलेला हा उपक्रम म्हणजे एका महान शिक्षकाला वाहिलेली प्रेमाची, कृतज्ञतेची आणि माणुसकीची अनमोल आदरांजली आहे!

'मुरासू' चक्रीवादळामुळे कोकण, मराठवाडा अन् .....

(पान १ वरून..) इशारा देण्यात आला आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, हे चक्रीवादळ ओंगोलच्या दक्षिणेकडे असलेल्या नेल्लोर आणि नरसापूरदरम्यान आंध्र प्रदेशच्या किनारपट्टीवर धडकू शकते. सोमवारी सायंकाळपूर्वीच्या ६ तासांमध्ये या चक्रीवादळाने ताशी १४ किलोमीटर वेगाने पश्चिम-वायव्य दिशेने प्रवास केला आहे. या चक्रीवादळामुळे केवळ दक्षिण भारतच नव्हे, तर महाराष्ट्र, कर्नाटक, मध्य प्रदेश, छत्तीसगड, झारखंड आणि बिहारमध्येही पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. याशिवाय ईशान्य भारतातील काही राज्यांमध्ये पाऊस पडण्याचा अंदाज आहे.

आंध्र प्रदेश: किनारपट्टीवरील प्रदेश आणि रायलसीमा भागात सलग २ दिवस मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता आहे.

तेलंगण: मंगळवारी वादळी वाऱ्यासह पाऊस पडेल.

मुख्यमंत्र्यांच्या हस्ते पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या विविध प्रकल्पांचा शुभारंभ

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन

आधुनिक तंत्रज्ञानाच्या गुन्हे नियंत्रणासाठी पोलीस दलाने सज्ज व्हावे

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पुणे : आधुनिक तंत्रज्ञान, सामाजिक उपक्रम आणि वेगवान तपासाच्या माध्यमातून गुन्हे नियंत्रणात पिंपरी चिंचवड पोलीस दलाने चांगली कामगिरी केली आहे. येत्या काळात पिंपरी चिंचवडचा विस्तार पुण्यापेक्षा अधिक होणार असल्याने पोलीस दलाने आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून प्रभावीपणे गुन्हे नियंत्रण करीत या आव्हानाला सक्षमपणे सामोरे जाण्यासाठी सज्ज व्हावे, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. युवाशक्तीला दिशा आणि शक्ती देण्यासाठी घर, परिसर, गाव, जिल्हा आणि महाराष्ट्र अंमली पदार्थमुक्त करावा, असे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या विविध प्रकल्पांचा शुभारंभ व लोकार्पण आज करण्यात आले. त्यानिमित्ताने पिंपरी चिंचवड येथील ग.दि. माडगूळकर नाट्यगृहात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, गृह राज्यमंत्री योगेश कदम, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, खासदार श्रीरंग बारणे, पिंपरी चिंचवडचे महापौर रवी लांडगे, पुण्याच्या महापौर मंजुषा नागपुरे, पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, देशात अंमली पदार्थाचे मोठे आव्हान आहे. युवा पिढीची क्षमता कमी करण्यासाठी आणि परिणामत: देशाची प्रगती रोखण्यासाठी देशात अंमली पदार्थ पाठविले जातात. याला पूर्णत: प्रतिबंध घालण्यासाठी पुढील ३ ते ४ वर्षात देश अंमली पदार्थमुक्त करण्याचा निर्धार शासनाने केला असून त्यासाठी सर्व विभागांनी एकत्रित प्रयत्न करायचे आहे. देशाच्या निर्मितीत महत्वाचे योगदान असलेल्या, नवोपक्रमात पुढे असलेल्या युवा पिढीला अंमली पदार्थांपासून वाचविण्यासाठी प्रत्येकाला या अंमली पदार्थ विरोधी मोहिमेत सहभाग घ्यावा लागेल.

राज्य शासन विविध पातळ्यांवर या दिशेने काम करीत आहे व्यसनाधीन व्यक्तींवर उपचार, लोकजागृती, अंमली पदार्थांच्या निर्मितीवर नियंत्रण आणणे, वितरण साखळी मोडीत काढणे अशा विविध जबाबदाऱ्या संबंधित यंत्रणांवर सोपविण्यात आल्या आहेत. पालकांनीदेखील व्यसनाधीन पाल्याचे समुपदेशन करण्यासोबत त्यावर योग्य उपचार वेळीच करावे, असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले.

पोलिसांना अत्याधुनिक सुविधा देण्यावर भर

मुख्यमंत्री म्हणाले, पिंपरी चिंचवडसाठी अत्यंत आधुनिक असे पोलीस मुख्यालय तयार करण्यात येत आहे. पोलीस आयुक्तालयाच्या नव्या इमारतीची रचना दिवंगत अजित पवार यांनी स्वत: लक्ष घालून तयार करून घेतली आहे. आयुक्तालयाची इमारत तयार झाल्यावर ते देशातील सर्वात आधुनिक पोलीस आयुक्तालय असेल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

पोलीस मुख्यालयासाठी देखील ५० एकर जागा देण्यात आली आहे. पोलीस अधिकाऱ्यांसाठी आधुनिक स्वरुपाची निवासस्थाने उभारण्यात येत आहेत. पोलिसांसाठीच्या निवासस्थानाचा पारंपरिक आराखडा बदलून सर्व सोईयुक्त निवासस्थाने पोलिसांना देण्यात येत आहेत. पोलीस कुटुंबांना सन्मानाने जगता यावे यासाठी चांगल्या घरांची निर्मिती तयार करण्यात येत आहे, असे श्री.फडणवीस यांनी सांगितले.

आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून गुन्हेगारांवर वचक

शहर सुरक्षित ठेवण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान गरजेचे आहे. डायल ११२ मुळे प्रतिसादाची वेळ ३ मिनीटावर आली आहे आणि पिंपरी चिंचवड पोलीस मुख्यालय याबाबतीत राज्यात प्रथम क्रमांकावर आहे. गुन्हे घडताना तात्काळ प्रतिसाद देऊन पोलीस कारवाई करताना दिसत आहेत. याची डिजीटल माहिती उपलब्ध होत आहे. गुन्हेगारांवर यामुळे वचक बसतांना दिसत आहे. रस्त्यावरील गुन्हे पूर्णत:नियंत्रणात आणण्याचे प्रयत्न सुरू आहे. गुन्हेगारांना शिक्षा होण्याचे प्रमाण वाढते आहे. सीसीटीव्ही नेटवर्कच्या माध्यमातून वाहतूक, गुन्हे नियंत्रणाचे काम शक्य होत आहे. एआय तंत्रज्ञानाद्वारे मानवी मर्यादांवर मात करून गुन्ह्यांचा तपास करता येतो. एआय आधारित 'तपास सारथी'मुळे तपास सुरू झाल्यापासून न्यायालयात जाईपर्यंत ब्लॉकचेन तंत्रज्ञानाद्वारे तपास व आरोपपत्र तयार करण्याचे काम होत आहे. यामुळे गुन्हे नियंत्रणात निश्चितपणे उपयोग होणार आहे.

सक्षम युवा पिढी घडविण्यासाठी अंमली पदार्थ विरोधी मोहिमेत सहभागी होण्याचे मुख्यमंत्र्यांचे आवाहन



पोलीस दलदेखील नवे तंत्रज्ञान आत्मसात करताना दिसत आहेत. बॉडीवॉर्न कॅमेऱ्यामुळे कमांड ण्ड कन्ट्रोल सिस्टीमलादेखील गुन्हे तपासाची माहिती मिळण्यासोबत पोलीसांना सुरक्षितता मिळणार आहे. वाहतूकीच्या तक्रारीदेखील यामुळे येत्या काळात कमी होतील. पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाने अत्यंत कमी कालावधीत चांगली प्रगती केल्याचे कौतुकोद्गार मुख्यमंत्र्यांनी काढले. पुढील १५ वर्षात पिंपरी चिंचवड परिसरात पुण्यापेक्षा जास्त लोकसंख्या असणार असल्याने पोलीस दलाने त्यादृष्टीने सज्ज राहण्याचे आवाहन त्यांनी केले.

उपमुख्यमंत्री श्री.शिंदे म्हणाले, जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी पोलिसांना चांगल्या सुविधा असणे गरजेचे आहे. पिंपरी चिंचवडसाठी उपलब्ध करून देण्यात आलेल्या अत्याधुनिक सुविधा गुन्हे नियंत्रणासाठी तसेच वाहतूक नियमनासाठी उपयुक्त ठरतील, असा विश्वास श्री.शिंदे यांनी व्यक्त केला. नागरिकांच्या सुरक्षेसाठी अहोरात्र झटणाऱ्या पोलिसांना हक्काची घरे व आवश्यक सुविधा देण्यासाठी शासनाचे विविध माध्यमातून प्रयत्न होत असून कालबद्ध कार्यक्रम निश्चित करण्यात आला आहे, असे त्यांनी सांगितले.

उद्याचे भविष्य असलेल्या तरुणाला अंमली पदार्थाच्या विळख्यातून मुक्त करण्यासाठी महाराष्ट्र शासन प्रयत्नशील आहे. पिंपरी चिंचवड पोलीस दलाने यासाठी सुरू केलेला उपक्रम स्तुत्य आहे. शहराची लोकसंख्या वाढत असताना शहराच्या सुरक्षिततेसाठी अनेक उपक्रमांची सुरुवात करण्यात आली आहे. पोलिसांना हक्काचे घर आणि शहराला सुरक्षेचे कवच मिळवून देण्यासाठी पोलीस आयुक्तालयाचे उपक्रम महत्वाचे आहेत. पिंपरी चिंचवड हे राज्यातील पहिल्या क्रमांकाचे मुख्यालय व्हावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. पोलीस आणि त्यांच्या कुटुंबियांची काळजी घेण्यासाठी राज्य शासन समर्थपणे पोलिसांच्या पाठीशी उभे राहील, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी दिली. पिंपरी चिंचवड पोलिसांनी दुष्काळग्रस्त शेतकरी बांधवांसाठी एक कोटीची मदत केली, ही पोलिसांची संवेदनशीलता आहे, अशा शब्दात त्यांनी पोलीस दलाचे कौतुक केले. राज्य शासनही शेतकऱ्यांच्या पाठीशी मजबूतीने उभे राहील, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी दिली. पिंपरी चिंचवड शहराने काही वर्षातच आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. पिंपरी चिंचवड शहराचा कायापालट करण्यात दिवंगत अजित पवार यांचे मोलाचे योगदान असल्याचेही त्यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार म्हणाल्या, पिंपरी चिंचवड शहराच्या सुरक्षिततेच्या आणि पोलीस दलाच्या आधुनिकीकरणाच्या दृष्टीने महत्वाचा दिवस आहे. उद्घाटन व भूमिपूजन करण्यात आलेल्या विविध विकास प्रकल्पाच्या माध्यमातून पिंपरी चिंचवड शहराच्या सुरक्षित भविष्याचा मजबूत पाया रचला जात आहे. स्व.अजित पवार यांनी पोलीस आयुक्तालयाच्या इमारतीसाठी १८० कोटी रुपये मंजूर केले होते. त्या माध्यमातून स्वतंत्र आणि आधुनिक पोलीस मुख्यालयाच्या दिशेने वाटचाल होत आहे.

पोलीस मुख्यालयासाठी ताथवडे येथील जमिनीच्या सातबाऱ्याचे हस्तांतरण आज करण्यात आले. पिंपरी चिंचवडच्या भविष्यातील सक्षम यंत्रणेसाठी हे ऐतिहासिक पाऊल आहे. पिंपरी चिंचवडच्या भविष्यातील गरजा लक्षात घेऊन पोलीस दलासाठी अनेक महत्वाचे प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत. चिखलीमध्ये पोलीस आयुक्तालयाची नवी इमारत, पिंपरी पोलीस संकुल, आळंदी येथे पोलीस स्थानकाची नवी इमारत, वाकड येथे अपर पोलीस आयुक्त कार्यालय, अंमली पदार्थाविरुद्ध टास्क फोर्सचे मुख्यालय, वाहतूक कार्यालय, सायबर कार्यालय आदींमुळे पिंपरी चिंचवड पोलीस मुख्यालयाला पायाभूत सुविधा मिळणार आहेत.

आजच्या काळात गुन्हेगारीचे स्वरुप बदलत आहे, शहराचा विस्तार होत आहे. त्यामुळे पोलीस दलाने आधुनिक होणे गरजेचे आहे. त्यामुळे आयटीएमएसमुळे वाहतुकीचे नियमन अधिक सुरळीतपणे होणार आहे. ज्येष्ठानुबंध या उपक्रमामुळे ज्येष्ठ नागरिकांना पोलीस दलाच्या माध्यमातून आधार आणि विश्वास मिळेल. दिशासारख्या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना सकारात्मक दिशा देण्याचे कार्य होत आहे. क्रीडा विभागाच्या माध्यमातून अशा उपक्रमांना आवश्यक सहकार्य करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. अंमलीपदार्थाविरुद्धच्या मोहिमेबद्दल उपमुख्यमंत्री पवार यांनी पिंपरी चिंचवड पोलीस दलाचे अभिनंदन केले. प्रास्ताविकात पोलीस आयुक्त चौबे यांनी आयुक्तालयाचे उपक्रम, नागरिक, उद्योग आदींच्या सुरक्षेबाबतची कामगिरी, आयुक्तालयासाठी वाहने, आधुनिक तंत्रज्ञान आदींसह विविध साधन सुविधांची उपलब्धता, आयुक्तालयाची यशस्वी कामगिरी आदींबाबत माहिती दिली.

यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी उपस्थितांना तसेच दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित शालेय विद्यार्थ्यांना अंमली पदार्थविरोधी शपथ दिली.

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे पोलिस अधिकारी कर्मचारी यांनी दुष्काळ ग्रस्तांसाठी एक दिवसाचा पगाराचा १ कोटी रुपयांचा धनादेश मुख्यमंत्री सहायता निधीला मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे सुपूर्द केला. पोलीस आयुक्तालयाच्या दिशा उपक्रमात सहभागी विजेत्या विद्यार्थ्यांना मुख्यमंत्र्यांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले.

कार्यक्रमास आमदार उमा खापरे, विक्रम काकडे, शंकर जगताप, सुनील शेळके, सुनील कांबळे, महेश लांडगे, शरद सोनवणे, बापूसाहेब पठारे, चेतन तुपे, बाबाजी काळे, जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, पोलीस सहआयुक्त डॉ. शशिकांत महावरकर आदींसह लोकप्रतिनिधी, पोलीस दलातील अधिकारी कर्मचारी, दिशा उपक्रमातील विद्यार्थी आदी उपस्थित होते. यावेळी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या मुख्यालयासाठी ताथवडे येथे मंजूर झालेल्या जागेच्या ७/१२ उताऱ्याचे औपचारिक हस्तांतरण आणि सार्वजनिक सुरक्षितता व वाहतूक व्यवस्थापन अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने आयुक्तालयाच्या सीसीटीव्ही व एकात्मिक वाहतूक व्यवस्थापन प्रणाली (आयटीएमएस) प्रकल्पाचा शुभारंभ करण्यात आला.

पिंपरी पोलीस ठाणे, पोलीस उपआयुक्त परिमंडळ १ कार्यालय, अंमली पदार्थविरोधी टास्क फोर्सचे विभागीय कार्यालय व २०० शासकीय निवासस्थाने यांचा समावेश असलेले पिंपरी पोलीस संकुलाचे भूमिपूजन आणि पोलीस दलाच्या आधुनिकीकरणासाठी ३५० बॉडी-वॉर्न कॅमेरे, ४ ड्रोन व ६५ नवीन पोलीस वाहनांचे लोकार्पणही श्री.फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. नशामुक्त पिंपरी चिंचवड अभियानाचा शुभारंभदेखील यावेळी करण्यात आला.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

डीसीसी बँक निवडणूक : मोठा राजकीय भूकंप! रणजीतसिंह मोहिते-पाटील, शिंदे, माने, परिचारकांसह दिग्गजांचे अर्ज बाद

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळ निवडणुकीच्या अर्ज छाननीत मोठी उलथापालथ

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

सोलापूर : जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळ निवडणुकीच्या अर्ज छाननीत मोठी उलथापालथ झाली आहे. कलम ८८ आणि ११० अ अंतर्गत सुरू असलेल्या सुनावणीचा परिणाम अनेक दिग्गज नेत्यांच्या उमेदवारीवर झाला असून, माजी आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील, संजयमामा शिंदे, राजन पाटील, दिलीप माने, प्रशांत परिचारक, सिद्धाराम म्हेत्रे यांच्यासह अनेकांचे अर्ज बाद करण्यात आले आहेत. दुसरीकडे खासदार धैर्यशील मोहिते-पाटील, आमदार सुभाष देशमुख, सचिन कल्याणशेट्टी, समाधान आवताडे, बाबासाहेब देशमुख आणि राजेंद्र राऊत यांचे अर्ज मंजूर झाल्याने निवडणुकीतील



राजकीय समीकरणांना नवे वळण मिळाले आहे.

जिल्हा बँकेच्या सभागृहात निवडणूक निर्णय अधिकारी मुकुंद पवार यांच्या उपस्थितीत ही छाननी प्रक्रिया पार पडली. विशेषतः कलम ८८ अंतर्गत आर्थिक जबाबदारी निश्चिती आणि कलम ११० अ अंतर्गत प्रशासकीय समितीशी संबंधित बाबींमुळे काही उमेदवारांचे अर्ज राखून ठेवण्यात आले होते. या अर्जांवर सुनावणी झाल्यानंतर अंतिम निर्णय जाहीर करण्यात आला. संबंधित तरतुदींअंतर्गत हरकती असलेल्या उमेदवारांचे अर्ज नामंजूर करण्यात आले.

बाद झालेल्या उमेदवारांमध्ये रणजितसिंह मोहिते-पाटील, संजयमामा शिंदे, राजन पाटील, जयवंत जगताप, दिलीप माने, प्रशांत परिचारक, सिद्धाराम म्हेत्रे, सुरेश हसापुरे, रश्मी बागल आणि बबनराव आवताडे यांचा समावेश आहे. या निर्णयामुळे जिल्हा बँकेच्या निवडणुकीतील अनेक राजकीय घराण्यांसमोर नवे आव्हान उभे राहिले आहे.

मात्र, प्रमुख नेत्यांचे अर्ज बाद झाले असले तरी त्यांच्या कुटुंबातील पुढील पिढी निवडणुकीच्या मैदानात उतरली आहे. पृथ्वीराज माने, श्रीदीप हसापुरे, शंभूराजे जगताप, बाळराजे पाटील, प्रणव परिचारक, सिद्धेश्वर आवताडे, अर्जुनसिंह मोहिते-पाटील आणि यशवंत शिंदे यांच्यासह अनेक उमेदवारांच्या माध्यमातून राजकीय घराण्यांनी आपले अस्तित्व टिकवण्याची तयारी केली आहे. रश्मी बागल यांनी आई शामल बागल यांना महिला राखीव मतदारसंघातून संधी दिली आहे.

दुसरीकडे मंजूर अर्जांमध्ये अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी, दक्षिण सोलापूरचे आमदार सुभाष देशमुख, आमदार राजेंद्र राऊत, समाधान आवताडे, खासदार धैर्यशील मोहिते-पाटील आणि सांगोल्याचे आमदार बाबासाहेब देशमुख यांचा समावेश आहे. तसेच राम सातपुते, शहाजीराजे देशमुख, रणजितसिंह शिंदे आणि बाबासाहेब पाटील यांच्या अर्जांवरील हरकतीही फेटाळण्यात आल्या आहेत.

या निकालातील सर्वाधिक लक्षवेधी बाब म्हणजे रणजितसिंह मोहिते-पाटील यांचा अर्ज बाद झाला असला, तरी त्यांचे बंधू खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांचा अर्ज मंजूर झाला आहे. त्यामुळे मोहिते-पाटील गटाची पुढील रणनीती काय असेल, याकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. त्याचप्रमाणे शिंदे, माने, पाटील आणि परिचारक कुटुंबातील पुढील पिढी आता निवडणुकीत कितपत प्रभाव दाखवते, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

अर्ज बाद झालेल्या उमेदवारांना विभागीय सहनिबंधकांकडे अपील करण्याची संधी आहे. त्यामुळे हा निर्णय अंतिम राजकीय चित्र ठरवणारा ठरणार की अपील प्रक्रियेतून काही उमेदवारांना दिलासा मिळणार, याची उत्सुकता आहे. जिल्हा बँकेच्या निवडणुकीत आता दिग्गज नेत्यांच्या थेट उमेदवारीपेक्षा त्यांच्या समर्थकांची आणि पुढील पिढीची ताकद निर्णायक ठरण्याची शक्यता आहे.

ऐन दिवाळीत पारेगावच्या शेतकऱ्याने जीवनयात्रा संपवली! सततची नापिकी आणि कर्जबाजारीपणामुळे अशोक खिल्लारे यांची विहिरीत उडी घेऊन आत्महत्या

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क



निफाड/प्रतिनिधी : ऐन दिवाळीचा सण तोंडावर आलेला असताना सततची नापिकी आणि कर्जबाजारीपणामुळे आर्थिक विवंचनेत सापडलेल्या येवला तालुक्यातील पारेगाव येथील शेतकऱ्याने रात्री विहिरीत उडी घेऊन आत्महत्या केल्याची हृदयद्रावक घटना घडली आहे. अशोक लक्षण खिल्लारे (वय ५९) असे मृत शेतकऱ्याचे नाव असून, त्यांच्या निधनामुळे पारेगाव परिसरात शोककळा पसरली आहे.

दुष्काळसदृश्य परिस्थिती, सततची नापिकी, शेतीचा वाढता खर्च आणि शेतमालाला मिळणारा कवडीमोल भाव अशा एक ना अनेक संकटांचा सामना करणाऱ्या बळीराजाच्या अडचणी दिवसेंदिवस वाढत आहेत. त्यातच गेल्या दोन वर्षांपासून शेतीतून अपेक्षित उत्पन्न मिळत नसल्याने अशोक खिल्लारे आर्थिक संकटात सापडले होते. कर्जाचा वाढता बोजा आणि कुटुंबाच्या उदरनिर्वाहाची चिंता यामुळे ते विवंचनेत असल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे.

दिवाळीचा सण अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपलेला असताना सण कसा साजरा करायचा, कर्जाची परतफेड कशी करायची आणि कुटुंबाचा उदरनिर्वाह कसा करायचा, असे अनेक प्रश्न त्यांच्यासमोर उभे होते. याच आर्थिक विवंचनेतून त्यांनी राहत्या घराशेजारी असलेल्या विहिरीत उडी घेऊन आपली जीवनयात्रा संपवली.

दिनांक २ नोव्हेंबर रोजी रात्री दहाच्या सुमारास त्यांच्या निधनाची दुर्दैवी घटना घडली. या घटनेची माहिती समजताच नातेवाईक, मित्रपरिवार आणि परिसरातील नागरिकांनी हळहळ व्यक्त केली. एका कष्टकरी शेतकऱ्याचा अशा प्रकारे दुर्दैवी अंत झाल्याने संपूर्ण परिसरात दुःखाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या घटनेमुळे पुन्हा एकदा शेतकऱ्यांच्या आर्थिक विवंचनेचा आणि शेती व्यवसायातील अनिश्चिततेचा गंभीर प्रश्न ऐरणीवर आला आहे. दोन वर्षांपासून नापिकी, उत्पादन खर्चात वाढ, शेतमालाला अपेक्षित भाव न मिळणे आणि कर्जाचा वाढता डोंगर यामुळे शेतकरी कुटुंबांचे आर्थिक गणित कोलमडत आहे. शेतकऱ्यांना केवळ आर्थिक मदतच नव्हे, तर योग्य बाजारभाव, पीकविमा, कर्जविषयक दिलासा आणि मानसिक आधार मिळण्याचीही गरज आहे.

दरम्यान, या घटनेमागील नेमकी कारणे आणि इतर बाबींचा तपास पोलिसांकडून केला जात आहे. अशोक लक्षण खिल्लारे यांचा शोकाकुल वातावरणात पारेगाव अमरधाम येथे सकाळी ९ वाजता अंत्यविधी झाला यावेळी तालुक्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून शेतकऱ्याच्या दुर्दैवी मृत्यूबाबत हळहळ व्यक्त केली.

ऐन सणासुदीच्या काळात एका शेतकरी कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळल्याने पारेगावसह येवला तालुक्यात हळहळ व्यक्त होत आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे शासनाने गांभीर्याने लक्ष देऊन अशा आर्थिक संकटात सापडलेल्या कुटुंबांना वेळीच आधार देण्याची गरज या घटनेने पुन्हा अधोरेखित केली आहे.

आमदार श्री सचिन दादा कल्याण शेट्टी यांचे वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप व शिक्षकांचा सन्मान

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

घोळसगाव येथील श्री अप्पासाहेब किवडे मित्र मंडळ यांचेकडून जि. प. प्रा. मराठी शाळा घोळसगाव या शाळेला नुकताच श्री स्वामी समर्थ शिक्षक सहकारी पतसंस्था यांचेमार्फत आदर्श शाळा पुरस्कार मिळाल्याबद्दल मुख्याध्यापक व सर्व शिक्षकांचा या मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला. तसेच अक्कलकोट तालुक्याचे लोकप्रिय आमदार माननीय श्री सचिनदादा कल्याणशेट्टी यांचे वाढदिवसानिमित्त जिल्हा परिषद प्राथमिक मराठी व कन्नड शाळा घोळसगाव या दोन्ही शाळेतील विद्यार्थ्यांना श्री अप्पासाहेब किवडे मित्र मंडळ घोळसगाव यांचेकडून वही, पेन, पेन्सिल तसेच केळी व बिस्कीट च्या स्वरूपात खाऊ वाटपाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान श्री अप्पासाहेब किवडे पंचायत समिती सदस्य अक्कलकोट यांनी भूषवले तर या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून श्री सागरदादा कल्याणशेट्टी उपसभापती पंचायत समिती अक्कलकोट यांची उपस्थिती लाभली तसेच या कार्यक्रमाला घोळसगावचे सरपंच श्री राजशेखर किवडे युवा नेते श्री बाबासाहेब पाटील, श्री शिवराज पोमाजी वीरभद्र स्वामी ,मंजुनाथ तेली, प्रवीण शेटगार ,सुनील सावंत रेवणाप्पा बोरगाव इत्यादी मान्यवर तसेच गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी घोळसगाव मराठी शाळेतील सर्व शिक्षकांचा तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री रामेश्वर पाटील व सर्व सदस्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला तसेच घोळसगाव कन्नड शाळेतील उपक्रम शील आदर्श शिक्षक श्री सिद्धाराम कोतले यांना आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचाही मान्यवरांच्या



हस्ते सन्मान करण्यात आला.तसेच गिरीश माशाळे सिद्धाराम त्रिगुळे भीम शंकर उमाटे महेश त्रिगुळे वीरपाक्ष उमाटे अमीन फकीर अरिफ दिवटे उपस्थित होते

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक सर्व शिक्षक स्टाफ व शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सदस्य नरसिंग कोलाटी , उमेश साळुंखे सचिन किवडे सोहेल मकानदार रियाज नदाफ बबलू कांबळे बसवराज अलुरे सागर आलुरे यांनी परिश्रम घेतले.

सोलापूर ज्येष्ठ नागरिक संघातर्फे राम तडवळकर यांचा सत्कार



दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

सोलापूर : सोलापूर तरुण भारतच्या चेअरमनपदी श्री.रामभाऊ तडवळकर यांची निवड झाली त्याबद्दल त्यांचा सोलापूर ज्येष्ठ नागरिक संघाच्यावतीने सत्कार करण्यात आला. मंगळवारी सायंकाळी पार्क मैदान येथील कार्यालयात झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संघाचे अध्यक्षश्री. व्हि.एन. कुलकर्णी हे होते.ज्येष्ठ सदस्य श्री.मादेवराव माने यांनी प्रास्ताविकातसंघाच्या कार्याचा आढावा घेतला.यावेळी श्री.पांडुरंग अदोने व ड.राजन दीक्षित यांची समयोचित भाषणे झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पत्रकार दशरथ वडतिले यांनी केले.संघाचे सहसचिव श्री.सतीश पाटील यांनी आभार मानले. सत्काराला उत्तर देताना श्री.तडवळकर यांनी अनेक सांगत,संघास सर्वतोपरी सहकार्य करण्याची ग्वाही दिली.या कार्यक्रमास सर्वांचे सचिव श्री.नागनाथ पाटील यांच्यासह संघाचे उपाध्यक्ष श्रीवल्लभ करकंबकर,खजिनदार श्री.अशोक गरड, सुनील आराध्ये,सुनील कुलकर्णी आदी उपस्थित होते.

आर्थिकदृष्टया सक्षम होण्यासाठी महिलांनी स्वयम् उद्योग सुरु करावा : अँड अरविंद बेडगे

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

नळदुर्ग/ दादासाहेब बनसोडे : महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करून त्यांना स्वतःच्या पायावर उभे राहण्याची संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने नळदुर्ग येथे सुवर्णराज महिला मंडळ व यशोधरा स्किल कॅडमी यांच्या वतीने मोफत फॅशन डिझायनिंग प्रशिक्षण कोर्सचा उद्घाटन सोहळा संपन्न करण्यात आला. यशोधरा स्किल अक्कॅडमीच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमाला शहरातील महिलांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी महिलांनी स्वयम् उद्योग सुरू करावा आसे प्रतिपादन ड अरविंद बेडगे यानी केले.

यशोधरा स्किल कॅडमी व सुवर्णराज महिला मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने शिवनकाम डिझायनिंग प्रशिक्षण उद्घाटन संपन्न

नळदुर्ग येथे नुकताच शिवनकाम फॅशन डिजाईनिंग मोफत प्रशिक्षण शिबीर संपन्न करण्यात आले त्यावेळेत कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते .

प्रथमता तथागत भगवान गौतम बुद्ध व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले यावेळी पुजनिय भन्ते गोविंदो यांनी सर्व उपस्थित मान्यवरांना त्रिशरण पंचशिल दिले.

यशोधरा स्किल कॅडमी व सुवर्णराज महिला मंडळाच्या मुख्य प्रवर्तक तथा अध्यक्षा सुवर्णताई झाडे यांनी उपस्थित ड अरविंद बेडगे , नळदुर्ग नगर परिषदेच्या विद्यमान नगरसेविका साक्षीताई नळदुर्गकर, प्रशिक्षिका प्रमिलाताई चटगे , पल्लवीताई बनसोडे अदि मान्यवरांचे शाल फेटा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.



कौशल्याचा उपयोग करून स्वतःचा व्यवसाय सुरू करा, आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हा आणि आपल्या कुटुंबांच्या संसाराला हातभार लागावा शिवाय महिलांनी उद्योग धंद्याकडे मार्गक्रमण करावे घर बसल्या व्यवसाय व आर्थिक विकास साधण्या करिता महिलांनी स्वावलंबन झाले पाहिजे आसा प्रेरणादायी संदेश संस्थेच्या

अध्यक्षा सुवर्णाताई झाडे यांनी उपस्थित प्रशिक्षणार्थी महिलांना दिला कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रशिक्षणार्थी महिला पार्वती वाघमारे , मिरा थोरात, ज्योती बनसोडे, आदीने परिश्रम घेतले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार पत्रकार तथा संपादक दादासाहेब बनसोडे यांनी मानले.

शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल आदर्श शाळा गौरव पुरस्कार

गोरगरिबांच्या लेकरांना ज्ञानाचे चांदणे देणाऱ्या नगरपालिका उर्दू शाळा नं १ आदर्श शाळा गौरव पुरस्काराने सन्मानित



दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

अक्कलकोट : श्री स्वामी समर्थ प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्था मर्यादित, अक्कलकोट यांच्या वतीने आयोजित आदर्श शिक्षक पुरस्कार सोहळा दि.३१ ऑक्टोबर रोजी दुपारी १:०० वाजता विकास फंक्शन हॉल येथे उत्साहात पार पडला.

या सोहळ्यात अक्कलकोट शहरातील कारंजा चौक येथील न.प. उर्दू शाळा नं.१ अक्कलकोट या शाळेला शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल आदर्श शाळा गौरव पुरस्काराने मान्यवरांच्या हस्ते गौरवण्यात आले.

गोरगरीब व कष्टकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांना शिक्षणाचा वसा देत त्यांच्या जीवनाला आकार देण्याच्या कार्याची दखल म्हणून हा गौरव करण्यात आला.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून परमपूज्य श्री.ष.ब्र.डॉ.राजशेखर शिवाचार्य महास्वामीजी,आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी, पंचायत समिती सभापती सौ. रश्मीताई हिप्परगी, उपसभापती सागर दादा कल्याणशेट्टी, माजी जिल्हाध्यक्ष अनिल कादे, सुरेश पवार, संस्थापक दयानंद कवडे, राज्य उपाध्यक्ष राजन सावंत, जिल्हाध्यक्ष अमोगसिद्ध कोळी, जिल्हा कार्यकारी अध्यक्ष सुनील कोरे, तालुकाध्यक्ष विठ्ठलराव ताटे व चरण शेळके, शिक्षक नेते शिवानंद बिराजदार आदी मान्यवरांच्या उपस्थित हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

पुरस्कार स्वीकारताना शाळेचे मुख्याध्यापक खालिद खान यांच्यासह रहीम शेख, नाहिदा शेख, सईदा शेख, शाहीन शेख, शहनाज शेख, नाझिया दंडोती, तसनीम सगरी आदी शिक्षक उपस्थित होते.

या यशाबद्दल शाळेचे सर्वत्र कौतुक होत असून मुख्याध्यापक व सर्व शिक्षकांचे अभिनंदन होत आहे अशी माहिती सामाजिक कार्यकर्ते सोहेल फरास यांनी दिली.

जिल्ह्यातील १७० गावांना १८३ टँकरद्वारे पाणीपुरवठा

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

सोलापूर, (जिमाका) : सोलापूर जिल्ह्यात टंचाई निवारणार्थ दि. ०३ नोव्हेंबर २०२६ रोजी १७० गावे व ८५३ वाड्यांमधील ३ लाख ४३ हजार ९११ नागरिकांना व ९९ हजार १२६ पशुधनाला १७० टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे. याशिवाय ४८ विहिरी व २४ बोअर असे एकूण ७२ जलस्रोत अधिग्रहित करण्यात आले आहेत, अशी माहिती जिल्हा परिषदेच्या पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता व्ही. डी. राठोड यांनी दिली. तालुकानिहाय मंगळवेढा ४२ गावे – ४५ टँकर, सांगोला २८ गावे – ३९ टँकर, अक्कलकोट १९ गावे – १३ टँकर, माढा १६ गावे – २१ टँकर, बार्शी १७ गावे – ६ टँकर, करमाळा १४ गावे – ११ टँकर, माळशिरस ११ गावे – ११ टँकर, उत्तर सोलापूर ९ गावे – १६ टँकर, दक्षिण सोलापूर ७ गावे – १० टँकर, मोहोळ ७ गावे – ११ टँकर असून पंढरपूर तालुक्यात एकही टँकर सुरू नाही. जिल्ह्यात टंचाईग्रस्त भागात टँकरद्वारे नियमित पाणीपुरवठा सुरू असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

सांगोला येथील गोळीबार करून केलेल्या मर्डर प्रकरणाला वेगळेच वळण

फिर्यादीने घेतली सुपारी देणाऱ्यांची नावे; मोठे मासे गळाला लागण्याची शक्यता

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर : पाचेगाव येथील गब्बर करचे यांचा फोरचुनर गाडीतच गोळ्या घालून केला होता मर्डर परंतु आज फिर्यादी मयताची पत्नी व मयताचा भाऊ यांनी सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांची भेट घेऊन हा मर्डर आटपाडीचे खा-जगी सावकार शिवाजी पाटील व त्यांचे बंधू शिवसेनेचे नेते तानाजी पाटील यांनी सुपारी देऊन केला असल्याची तक्रार दिली.



पाचेगाव परिसरातील सुमारे शंभर ते दोनशे नागरिक व नातेवाईकांनी सोला-पूर जिल्हा पोलिस अधीक्षक कार्यालयात ठिय्या मांडला व सांगोला पोलीस निरीक्षक यांच्यावर आरोप करत त्यांचे कडुन तपास काढून घेऊन वरिष्ठ अधिकार्या कडे तपास द्यावा अशी मागणी केली .

यावेळी जिल्हा पोलिस अधीक्षक कुलकर्णी सो यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेत सदर गुन्ह्याचा तपास डिवाय एसपी स्तरावरील अधिकाऱ्यांकडे वर्ग केला व एलसीबी विभागाच्या वतीने विशेष तपास पथका कडून तपास करीत सदर प्रकरणी न्याय मिळवून देण्याचे आश्वासन दिले.

निफाड वकिल संघाच्या निवडणुकीत अध्यक्षपदी ॲड. किरण गुंजाळ, उपाध्यक्षपदी ॲड. तुषार भानुवंशे यांची बिनविरोध निवड

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क



निफाड/प्रतिनिधी : निफाड वकील संघाच्या त्रैवार्षिक निवडणुकीसाठी गुरुवार दि २९ रोजी झालेल्या मतदान प्रक्रीयेत २४४ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला.

नफाड वकिल संघाची त्रैवार्षिक निवडणुक प्रक्रिया निवडणुक निर्णय अधिकारी ॲड. नरेंद्र राणा, सहाय्यक निवडणुक अधिकारी ॲड. राजेंद्र हांडगे, ॲड. विजय माठा आद-र्नी कामकाज केले निवडणुक प्रक्रीयेदरम्यान अध्यक्षपदासाठी ॲड. किरण गुंजाळ, उपाध्यक्ष पदासाठी ॲड. तुषार भानुवंशे, महिला उपाध्यक्ष पदासाठी ॲड. विजया जगताप, सचिव पदासाठी ॲड. तुकाराम जाधव, खजिनदार पदासाठी ॲड. वैभव पानगव्हाणे, दहा वर्षाचे आतील सदस्य पदासाठी ॲड. प्रथमेश कुलकर्णी,महिला सदस्य पदासाठी ॲड. रेखा सुरासे यांची बिनविरोध निवड झाली होती.

मात्र वाचनालय प्रतिनिधी एका जागेसाठी ॲड. श्रीकांत वल्टे व ॲड. लक्ष्मण वाघ, महिला सचिव पदासाठी ॲड निर्मला अरिंगळे व ॲड. अफरोज शेख, सदस्य पुरुष दोन पदासाठी ॲड. रवींद्र घोटेकर, ॲड. अमोल सानप, ॲड. प्रफ ुल्ल गवळे, ॲड. दिलीप शिंदे हे उमेदवार रिंगणात होते. म तदानादरम्यान २४४ मतदारांनी मतदान केले. मतमोजणी पार पडुन निकालाअंती वाचनालय प्रतिनिधी एका जागेसाठी कंसात मिळालेली मते ॲड. श्रीकांत वल्टे (१२३) ॲड. लक्ष्मण वाघ(१२०) यात ॲड. श्रीकांत वल्टे विजयी झाले.

महिला सचिव पदासाठी ॲड. निर्मला अरिंगळे (१६१), ॲड. अफरोज शेख(८३) यांचेत लढत होऊन ॲड. निर्मला अरिंगळे विजयी झाल्या. सदस्य पुरुष दोन पदासाठी ॲड रवींद्र घोटेकर (१४८) ॲड. अमोल सानप (१३२) ॲड. प्रफ ुल्ल गवळे(९९) ॲड दिलिप शिंदे(५६) अशी मते मिळाली.

ॲड. रवींद्र घोटेकर व ॲड. अमोल सानप विजयी झालेचे निवडणुक निर्णय अधिकारी ॲड. नरेंद्र राणा यांनी घोषित केले.

निफाड वकिल संघाचे सर्व सिनियर ज्युनियर सभासदांनी एकमताने मला अध्यक्षपदाची जबाबदारी दिली. ती जबाबदारी सर्व पदाधिकारी व जेष्ठांच्या सहकार्याने पार पाडेल. वकिलांचे हक्क व हित जोपासण्याचा काटेकोर प्रयत्न करेल, असे ॲड. किरण गुंजाळ, अध्यक्ष निफाड वकिल संघ निफाड म्हणाले.

शेतकरी आत्महत्या वक्तव्याचा पंढरपुरात शिवसेना (उबाठा) कडून निषेध

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क



पंढरपूर : शिवसेना शिंदे गटाची आमदार संजय गायकवाड यांनी शेतकऱ्याबाबत केलेल्या वादग्रस्त वक्तव्यामुळे नवाब निर्माण झाला असून आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या अंत्यविधीला ही जाऊ नका असा आशयाची वक्तव्य आमदार गायकवाड यांनी केलेल्या आरोप करत पंढरपुरात शिवसेना उद्धव बाळास-ाहेब ठाकरे पक्षाचे वतीने तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला.

आमदार गायकवाड यांना तातडीने विधानसभेत मधून बडतर्फ करण्यात यावी व बळीराजाचा अपमान करणाऱ्या वाचाळ वीर आमदार गायकवाड यांच्यावर त्वरित कारवाई करावी या मागणीचे निवेदन निव-ासी नायब तहसीलदार श्री बालाजी पुदलवाड यांच्याकडे देण्यात आले. दुष्काळी, अवकाळी पाऊस, शेतमालाला मिळणारा अपुरा भाव, वाढता उत्पादन खर्च, आणि कर्जबारी पणाच्या विळख्यात, अडकला आहे. मला मातीमोल दराने विकावं लागत असल्याने आर्थिक संकट अधिक गळत झाले आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांच्या आत्महत्या सारख्या संवेदनशील विषयावर हवामान कारक भाष्य करणे योग्य नाही असे मत शिवसेना जिल्हाप्रमुख संभाजी राजे शिंदे यांनी व्यक्त केले. यावेळी संभाजी शिंदे तालुकाप्रमुख बंडू घोडके उपजिल्हाप्रमुख काकासाहेब बुरांडे शहर प्रमुख युवराज ओमेवाडीकर अर्जुन भोसले इंद्रजीत गोरे रंजीत कदम संजय घोडके गणेश रितुंड नामदेव चव्हाण उत्तम कराळे समाधान गोरे दिलीप उगाडे भारत कदम संजय पवार विजय बागल स्वप्नील गावडे कल्याण कदम अश्फाक मुजावर , महेश कांबळे आकाश माने, ऋषिकेश कवडे, जालिंदर शिंदे, सचिन मोरे सचिन शिंदे, सतीश पाटील आधीच शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शेतकऱ्यांच्या आरोग्यासाठी कृषी विभाग व रोटरी क्लबचा स्तुत्य उपक्रम

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

ठाणे प्रतिनिधीमिलिंद जाधव : कष्टकरी शेतकरी व शेतमजुरांच्या आरोग्याची काळजी घेण्याच्या उद्देशाने कृषी विभाग, रोटरी क्लब ऑफ मुंबई मुलुंड साऊथ आणि संगम मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने अंबाडी येथे मोफत बहुविशेषज्ञ आरोग्य तपासणी शिबिर व शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात हिंदुजा व फोर्टिस रुग्णालयांतील तज्ज्ञ डॉक्टरांनी सहभाग घेतला. दात, डोळे, गुडघेदुखी, सांधेदुखी, न्यूरो, रक्त तपासणी, ईसीजी, महिला आरोग्य तसेच पोटाच्या आजारांची तपासणी मोफत करण्यात आली.

संकटकाळात कायम पुढे असणारे मनसे नेते दिलीप बापू धोत्रे यांनी केली तातडीने मदत

शेतकरी मेळाव्यात पीएमएफएमई, ग्रीस्टॅक, खेत बचाओ अभियान, कृषी यांत्रिकीकरण, माती परीक्षण, नैसर्गिक शेती व विविध शासकीय अनुदान योजनांची माहिती देण्यात आली. तसेच बियाणे, खते व कीटकनाशक कंपन्यांच्या स्टॉलद्वारे आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचे मार्गदर्शन करण्यात आले.

या उपक्रमासाठी तालुका कृषी अधिकारी डी. सी. शिंदे, कृषी गुणनियंत्रण निरीक्षक विवेक दोंदे, मंडळ कृषी अधिकारी गोरखनाथ मुरकुटे यांच्यासह कृषी विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विशेष मेहनत घेतली. रोटरी क्लबच्या अध्यक्षा वर्षा माणेक, मेडिकल डायरेक्टर भावेश ठक्कर, डॉ. अपर्णा पाडगावकर, जागृती पारेख व कुणाल खोना यांनी सहकार्य केले. कृषी विभागातील बाळ-ाराम ताटे, बी. जी. गायकवाड, मनोज पवार, हर्षल पाटील, तुषार राऊत, नूतन पाटील, अर्चना धलपे, प्रियांका ठाकरे, मनीषा निळे,



देवेंद्र महाजन, अतुल पाटील, शिवाजी काळणार, यश पवार, नरेश बुजड, धनंजय गावंडा, वैभव लढी, ओम भांबरे, किशोर मांजे व राहुल म्हसदे यांनी शेतकऱ्यांना म ार्गदर्शन केले. सागर संकेत कृषी सेवा केंद्राचे मधुकर पाटील यांचे चिरंजीव गौतम पाटील व त्यांच्या पत्नी डॉ. दामिनी पाटील यांनी संगम हॉस्पिटलची इमारत व परिसर उपलब्ध करून दिला. तसेच पानी फाउंडेशनशी संलग्न महिला बचत गटांनी उत्स्फूर्त सहभाग घेत महिलांच्या आरोग्य तपासणीसाठी पुढाकार घेतला.शेतकऱ्यांचे आरोग्य आणि शेतीचा विकास या दोन्ही बाबींना महत्त्व देणारा हा उपक्रम सामाजिक बांधिलकीचे उत्तम उद-ाहरण ठरला. मोफत आरोग्य तपासणी व कृषीविषयक मार्गदर्शनाचा लाभ मिळाल्याने शेतकरी आणि ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले.

मराठवाड्याच्या दुष्काळमुक्तीसाठी नदी जोड प्रकल्प तातडीने सुरू करा - कळंबकरांची पंतप्रधानांकडे निवेदनाद्वारे मागणी

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

कळंब/प्रतिनिधी : देशातील नद्यांचे अतिरिक्त व समुद्रात विसर्जित होणारे पाणी अवर्षणग्रस्त प्रदेशात पोहोचविण्यासाठी केंद्र सरकारने सन १९८० मध्ये मांडलेली राष्ट्रीय नदी जोड प्रकल्पाची संकल्पना प्रत्यक्षात आणावी, अशी मागणी कळंब येथील सुजाण नागरिकांच्या वतीने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

कळंब येथील शिष्टमंडळाने उपविभागीय अधिकारी गणेश शिंदे आणि तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी कळंब हेमंत ढोकले यांच्या मार्फत दि. ३ नोव्हेंबर २०२६ रोजी हे निवेदन भारत सरकारला सादर केले. तसेच राष्ट्रीय नदी जोड प्रकल्पाच्या माध्यमातून हिमालयीन नद्यांचे म्हणजेच गंगा व गंगेच्या उप-नद्या, यमुना, घागरा, कोशी, गंडकी, शारदा, तसेच दक्षिणेतील गोद-ावरी, कृष्णा, कावेरी, पैनगंगा, सुवर्णरेखा यांसह अनेक छोट्या-मोठ्या नद्यांचे अतिरिक्त पाणी, जे दरवर्षी समुद्रात वाया जाते, ते दक्षिण भारतात कन्याकुम ारीपर्यंत जलवाहिनीच्या स्वरूपात प्रवाहित करून देश सुजलाम-सुफलाम करणे, हे या प्रकल्पाचे मुख्य उद्दिष्ट आहे. महाराष्ट्रातील मराठवाडा विभाग हा सातत्याने दुष्काळी परिस्थितीचा सामना करणारा विभाग आहे. येथील शेतकरी, शेतमजूर, पशुधन आणि सर्वसामान्य नागरिकांसह संपूर्ण सजीवसृष्टीला पाणीटंचाईचा जी-वघेणा संघर्ष करावा लागत आहे. हीच परिस्थिती कायम राहिली तर भविष्यात येथे वाळवंटसदृश भूमी व वातावरण तयार होण्यास वेळ लागणार नाही, याकडे निवेदनात लक्ष वेधण्यात आले आहे. त्यामुळे केंद्र शासनाने राष्ट्रीय नदी जोड प्रकल्पाचा सखोल विचार करून, या नदी जोड साख-ळीत महाराष्ट्रातील सदाअवर्षणग्रस्त मराठवाडा विभागाला कायमच्या दुष्काळमुक्तीसाठी प्राधान्याने समाविष्ट करावे. यामुळे या जलवाहिनीचे पाणी मराठवाड्यास उपलब्ध होईल आणि देशांतर्गत प्रादेशिक आर्थिक विकासाचा कायमस्वरूपी समतोल साधला जाईल. हा प्रकल्प प्राधान्याने व त्वरित सुरू करावा, अशी महाराष्ट्रासह म राठवाड्यातील समस्त जनमानसाची आर्त विनंती व मागणी असल्याचे निवेदनात नम ूद करण्यात आले आहे. या निवेदनावर महादेव महाराज अडसूळ, डॉ. संजय कांबळे, सतीश टोणगे, सुभाष घोडके, हरिभाऊ कुंभार, मकरंद पाटील, अड. मनोज चोंदे, कचरू टकले, मुख्तार मिर्झा, अनिल यादव, राजाभाऊ कोळपे, मुस्ताक कुरेशी, अड. अश-ोक चोंदे, माधवसिंग राजपूत, ए.एस. चोंदे, महेश कोळपे, नवनाथ भंडारे, यशवंत हौसलमल, पोपट साळवे, कल्याण खापे, गुलाब बागवान आदी मान्यवरांच्या सह्या आहेत.



संतोष घाडगे सर यांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी केलेली उपक्रम हे प्रेरणादायी... आयोजकांचे मनोगत

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर : सांगोला येथील सूर्यो दय फाउंडेशन च्या वतीने शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय व आदर्श कामगिरी करणाऱ्या शिक्षकांचा गौरव करण्यासाठी शिक्षक गौरव पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते व या सोहळ्यात पंढरपूर तालुक्यातील शांत बसला अजून तोंड येथील उपक्रमशील शिक्षक श्री संतोष हरिश्चंद्र घाडगे सर यांना त्यांच्या मुलाच्या शैक्षणिक कार्याची दखल घेऊन शिक्षक गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार वितरण सोहळा शनिवार दिनांक ३१ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी दोन वाजता सांगोला येथील नगरपरिषदेसमोरील अहिल्यादेवी होळकर सभागृहामध्ये मोठ्या उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या व्यासपीठावर सूर्य उद्योग समूहाचे संस्थापक अध्यक्ष तथा एल के पी मल्टीस्टेट चे चेअरमन अनिल भाऊ ईगवले व सरोदे अर्बन बँकेचे चेअरमन श्रीबंडोपंत लवटे, माझी चेअरमन जगन्नाथ भगत सर, एल के पी संस्थेचे व्हाईस चेअरमन सुभाष दिघे सर, यांच्यासह संस्थेची पदाधिकारी मान्यवर आणि शिक्षक उपस्थित होते व श्री संतोष घाडगे सरांनी विद्यार्थ्यांना केंद्रबिंदू मानून त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी व शैक्षणिक प्रगतीसाठी केलेली कार्य अत्यंत प्रेरणादायी असे मनोगत आयोजकांनी व्यक्त केले यावेळी अनिल भाऊ इंगवले यांचे हस्ते श्री संतोष घाडगे सर यांना शाल श्रीफळ व मानपत्र आणि सन्मान चिन्ह देऊन स पत्नी व सहपरिवार गौरविण्यात आले या कार्यक्रमास महाराष्ट्राचे प्रमुख वक्ते माननीय श्री नितीन बानगुडे पाटील व उमरगा जनता सहकारी बँकेचे चेअरमन माननीय श्री शरण भैया बसवराज पाटील हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते व या प्रसंगी प्रशालीचे मुख्याध्यापक माननीय श्री व्ही एस सरवड सर व त्यांची सहकारी शिक्षक कुटुंबीय विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. पुरस्कार स्वीकारल्यानंतर उपस्थितानी त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



इंग्रजी वक्तृत्व स्पर्धेत द्वितीय क्रमांकासह गौरव

स्वेरीच्या सोनाली कांबळे यांचे युवा महोत्सवात उल्लेखनीय यश



दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर : गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील स्वेरी तथा श्री विठ्ठल एज्युकेशन ॲंड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस)च्या मेक्कॅनिकल इंजिनिअरिंग विभागाच्या अंतिम वर्षातील विद्यार्थिनी सोनाली सतिश कांबळे यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर अंतर्गत आयोजित बावीसाव्या युवा महोत्सवात उल्लेखनीय यश संपादन केले त्याबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

बार्शीतील श्री शिव-ाजी महाविद्यालयात आयोजिलेल्या युवा महोत्सवात इंग्रजी वक्तृत्व स्पर्धे त स्वेरीच्या मेक्कॅनिकल इंजिनिअरिंग विभागाच्या अंतिम वर्षातील विद्यार्थिनी सोनाली सतिश कांबळे यांनी द्वितीय क्रमांक प्राप्त केला. त्यांच्या या यशामुळे स्वेरीच्या नावलौकिकात भर पडली आहे. युवा महोत्सव हा विद्यार्थ्यांच्या कलागुणांना, सर्जनशीलतेला आणि सुप्त क्षमतांना व्यासपीठ उपलब्ध करून देणारा महत्त्वपूर्ण उपक्रम आहे. या महोत्सवाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना वक्तृत्व, साहित्य, कला, संगीत आणि सांस्कृतिक क्षेत्रांतील आपले कौशल्य सादर करण्याची संधी मिळते तसेच विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, नेतृत्वगुण, संवादकौशल्य, सांघिक भावना आणि निरोगी स्पर्धात्मक वृत्ती विकसित होण्यास मदत होते. अशा विद्यापीठस्तरीय व्यासपीठावर सोनाली कांबळे यांनी मिळविलेले यश त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरले आहे. इंग्रजी वक्तृत्व स्पर्धेत विचारांची स्पष्टता, भाषेवरील प्रभुत्व, आत्मविश्वास आणि प्रभावी सादरीकरण या गुणांना विशेष महत्त्व असते. सोना-ली कांबळे यांनी आपल्या वक्तृत्व कौशल्याच्या बळावर या स्पर्धेत यश संपादन केले. अभियांत्रिकीच्या तांत्रिक शिक्षणासोबतच वक्तृत्व आणि संवादकौशल्य या क्षेत्रांतही त्यांनी मिळविलेले यश उल्लेखनीय आहे. या उल्लेखनीय यशामागे सोनाली यांची सातत्यपूर्ण तयारी, विचार मांडण्याची क्षमता आणि आत्मविश्वासपूर्ण सादरीकरण यांचा महत्त्वपूर्ण वाटा आहे. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी तसेच त्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी आयोजित करण्यात येणाऱ्या युवा महोत्सवामध्ये त्यांनी मिळविलेले हे यश इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरणारे आहे. या यशामागे स्वे-रीचे संस्थापक व प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे यांनी संस्थेमध्ये रुजविलेली गुणवत्तापूर्ण, विद्यार्थी केंद्रित शिक्षण संस्कृती आणि त्यांचे दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व यांचा महत्त्वपूर्ण वाटा आहे. संस्थेचे सचिव डॉ. सूरज रोंगे यांचे प्रेरणादायी नेतृत्व, उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार यांचे शैक्षणिक म ार्गदर्शन तसेच मेक्कॅनिकल इंजिनिअरिंग विभागप्रमुख डॉ. संदीप वांगीकर यांच्या मार्गदर्शनाखाली विभागातील प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांना दिलेले गुणवत्तापूर्ण अध्यापन, सातत्यपूर्ण शैक्षणिक मार्गदर्शन आणि प्रेरणादायी वातावरण यामुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मि ळत आहे. सोनाली कांबळे यांनी मिळविलेले हे यश त्यांच्या प्रयत्नांना मिळालेली यशस्वी पावती असून संपूर्ण स्वेरी परिवारासाठी हा अभिम ानाचा क्षण ठरला आहे. सोनाली कांबळे यांच्या यशाबद्दल स्वेरीच्या वतीने सौ. बेडकीहाळ यांच्या हस्ते व महाराष्ट्र पत्रकार कल्याण निधीचे संस्थापक अध्यक्ष रवींद्र बेडकीहाळ, पत्रकार व साहित्यिक आनंद साठे, स्वेरीचे संस्थापक व प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे, विश्वस्त एच. एम. बागल व मान्यवरांच्या उपस्थितीत सन्मानित करण्यात आले. स्वेरीचे संस्थापक व प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे, संस्थेचे अध्यक्ष अशोक भोसले, उपाध्यक्ष सुरेश राऊत, सचिव डॉ. सूरज रोंगे, संस्थेचे सर्व पदाधिकारी व विश्वस्त, संस्थेअंतर्गत कार्यरत असलेल्या बी.फार्मसीचे प्राचार्य डॉ. एम. जी. मणियार, डिप्लोमा इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. एन. डी. मिसाळ, डी.फार्मसीचे प्राचार्य डॉ. एस.व्ही.म ांडवे, पदवी इंजिनिअरिंगच्या उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, इतर अधिष्ठाता, सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांनी सोनाली कांबळे यांचे अभिनंदन केले आहे.